# सीएसटी-वडाळा मेट्रो ११ साठीही हवे 'जायका' चे कर्ज

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईतील आणखी एका मेट्रो प्रकल्पाला जपानच्या जायका या वित्त संस्थेकडून कर्ज मिळण्याची शक्यता आहे. या वित्तसंस्थेचे प्रमुख नुकतेच मुंबई भेटीवर आले होते. त्यावेळी सीएसटी ते वडाळा या मेट्रो ११ मार्गासाठी कर्ज मिळण्याची विनंती जायकाला करण्यात आल्याचे कळते.

मुंबईतील बहुसंख्य प्रकल्पांना जायका वित्त पुरवठा करत असून यात मेट्रोसह शिवडी-न्हावा शेवा प्रकल्पाचाही समावेश आहे. एमएमआरडीए मुंबई आणि परिसरात १३ मेट्रो मार्ग बांधत आहे. त्यापैकी सीएसटी ते वडाळा हा मार्ग एमएमआरडीए बांधणार होते. मात्र हा मार्ग बांधण्यास मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने स्वारस्य दाखवले आणि तसा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पाठवला होता. हा मार्ग भूमिगत आहे. कोर्पोरेशन सध्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा भूमिगत मेट्रो मार्ग बांधत असून या मार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. भूमिगत मार्ग बांधण्याचा अनुभव असल्याने सीएसटी ते वडाळा मार्गाच्या बांधणीत कॉर्पोरेशनने उत्सुकता दाखवली होती. त्यांचा हा प्रस्ताव राज्य सरकारने मंजूर केला आहे.

मेट्रो ११ हा मार्ग वडाळा - घाटकोपर-ठाणे-कासारवडवली या मेट्रो ४ मार्गाचा विस्तार आहे. हाच मार्ग कासारवडवलीच्या पुढे गायमुख पर्यंत विस्तारला जाणार आहे.

मेट्रो ११ साठीही कर्ज घ्यावे लागणार आहे. सध्या जायका ही कर्ज पुरवठा करणारी मोठी संस्था असून एमएमआरडीए आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अनेक प्रकल्पात या संस्थेने मोठ्या प्रमाणावर कर्ज दिले आहे.